गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८



दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक ५५ वा ● मंगळवार ११ जुलै २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| Volume 1 | Issue 55 | Date : 11/07/2023 | blow : Tuesday | Page 4 | Price 4


# उत्तर भारतात पावसाचा हाहाकार, जनजीवन विस्कळीत; आत्तापर्यंत ३७ जणांचा मृत्यू

नवी दिल्ली : उत्तर भारतात पावसान थैमान घातलं आहे. यामुळं अनेक भागात जनजीवन विस्कळीत झालं आहे. पावसामुळं आत्तापर्यंत उत्तर भारतात ३७ जणांचा मृत्यू झाला आहे. मदत आणि बचाव कार्याला गती देण्यासाठी लष्कर आणि एनडीआरएफच्या अनेक तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडच्या मुख्यमंत्र्यांशी परिस्थितीची माहिती घेतली आहे. केंद्र सरकारकडून सर्वतोपरी मदत आणि सहकार्य करण्याचे आश्वासन पंतप्रधानांनी दिले आहे.

गेल्या काही दिवसापासून हिमाचल प्रदेशात मुसळधार पाऊस सुरु आहे. मुसळधार पावसामुळं अनेक भागात पूर आला आहे. यामध्ये आत्तापर्यंत १८ जणांचा मृत्यू झाला आहे. याशिवाय बहुतांश जलविद्युत प्रकल्पांचे पावसामुळं नुकसान झालं आहे. शेकडो कोटींच्या मालमत्तेचे नुकसान झालं आहे. एकट्या शिमला जिल्ह्यात सोमवारी भूस्खलनात चार जणांचा मृत्यू झाला. शिमल्याच्या थेओग उपविभागात सोमवारी सकाळी एका घरावर दरड कोसळल्याने तिघांचा मृत्यू झाला.



उत्तराखंडमध्येही मुसळधार पावसामुळं जनजीवन विस्कळीत झालं आहे. अनेक भागात पूरस्थिती निर्माण झाली आहे. राज्यात गेल्या २४ तासांत सरासरीपेक्षा २.५ ते ३ पट जास्त पाऊस झाला आहे. उत्तराखंडमध्ये मुसळधार पाऊस आणि भूस्खलनामुळं वाहनांचे अपघात आणि घरांची पडझड होऊन आठ जणांचा मृत्यू झाला आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यांना रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. दरड कोसळण्याची शक्यता असल्याने सरकारने लोकांना सावधगिरीने प्रवास करण्याचे आवाहन करण्यात आलं आहे. ११ ते १२ जुलैसाठी, कुमाऊं आणि त्याच्या लगतच्या गढवाल, चमोली भागात अति मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

दिल्लीत गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळं यमुना नदीच्या पाणीपातळीत मोठी वाढ झाली आहे. हरियाणातील हथिनीकुंड बॅरेजमधून पाणी सोडण्यात आल्यानंतर यमुनेच्या पाण्याची पातळी झपाट्याने वाढत आहे. दिल्लीत यमुनेने धोक्याचा टप्पा ओलांडला आहे. धोक्याच्या चिन्हाची । पान २ वर



## महिला व बालकल्याण आयुक्तपदी डॉ. प्रशांत नारनवरे रूजू

मुंबई : महिला व बालविकास विभागाच्या आयुक्तपदाची सूत्रे डॉ. प्रशांत नारनवरे यांनी आज स्वीकारली. यावेळी बालविकासचे उपायुक्त राहुल मोरे, प्रशासन विभागाच्या उपायुक्त वर्षा पवार यांनी पुष्पगुच्छ देऊन डॉ. नारनवरे यांचे स्वागत केले. श्री. नारनवरे हे प्रशासन सेवेतील २००९ तुकडीचे अधिकारी आहेत.डॉ. नारनवरे यांनी सांगली येथील जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, उस्मानाबाद व पालघरचे जिल्हाधिकारी आणि सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको यासारखी पदे भूषवली आहेत.जनतेप्रती प्रशासनात संवेदनशीलता निर्माण करणे, उत्तरदायित्वाची भावना निर्माण करून प्रशासन अधिक जलद करणे हे उद्दिष्ट्ये ठेवून डॉ. नारनवरे यांची कार्यप्रणाली राहिलेली आहे.यावेळी सहायक आयुक्त योगेश जवादे, उपसंचालक सुचिता साकोरे, सहायक आयुक्त मनीषा बिरारीस, सहायक आयुक्त ममता शिंदे, परीविक्षा अधीक्षक दत्तात्रय मुंडे, रचना व कार्यपद्धती अधिकारी गोविंद इसानकर, सांख्यिकी अधिकारी प्रमोद निकाळजे, झुंबर जाधव, अश्विनी कांबळे उपस्थित होते.


## १ ऑगस्टला पंतप्रधान मोदी पुणे दौऱ्यावर

पुणे : यंदाच्या लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्काराची घोषणा करण्यात आली आहे. यंदाचा लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना देण्यात येणार आहे. रोहित टिळक यांनी ही घोषणा केली आहे. पुण्यात होणाऱ्या या पुरस्कार सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी उपस्थितीत राहणार आहे. १ ऑगस्ट रोजी हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

त्यामुळे १ऑगस्टला पंतप्रधान नरेंद्र मोदी पुण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी शरद पवारांना देखील आमंत्रण देण्यात येणार असल्याचं रोहित टिळकांनी सांगितलं आहे. त्यांच्यासोबतच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार हे उपस्थितीत राहणार आहेत. त्यामुळे सत्तानाट्यानंतर पहिल्यांदात राजकीय नेत्यांची मोठी फळी या कार्यक्रमासाठी एकाच मंचावर येणार आहेत

## वेदांताचा फॉक्सकॉनसोबत काडीमोड; सेमीकंडक्टर उत्पादनावर परिणाम ?

मुंबई : तैवानमधील कंपनी फॉक्सकॉनने भारतीय कंपनी वेदांतासोबतच्या सेमीकंडक्टर प्रकल्पातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे. फॉक्सकॉनच्या या निर्णयामुळे खळबळ उडाली असताना दुसरीकडे केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि आयटी राज्यमंत्री राजीव चंद्रशेखर यांनी अधिकृत निवेदन जारी केले आहे. फॉक्सकॉनच्या या निर्णयाचा परिणाम भारताच्या सेमीकंडक्टर फॅब्रिकेशन प्लांटवर होणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. सेमीकंडक्टरबाबत भारताने ठरवलेले लक्ष्य साधले जाईल असेही त्यांनी म्हटले. इलेक्ट्रॉनिक्स आणि आयटी राज्यमंत्री राजीव चंद्रशेखर यांनी ट्वीट करत



म्हटले की, वेदांतासोबतच्या संयुक्त प्रकल्पातून फॉक्सकॉनने माघार घेतल्याचा परिणाम भारताच्या सेमीकंडक्टर फॅब्रिकेशन लक्ष्यांवर कोणताही परिणाम होणार नाही. 'वेदांत फॉक्सकॉन'ने गुजरातमध्ये सुमारे १.५ लाख कोटी डॉलर अमेरिकन डॉलरच्या गुंतवणुकीसह भारतातील पहिले इलेक्ट्रॉनिक चिप उत्पादन युनिट स्थापन करण्याची घोषणा केली होती.

चंद्रशेखर यांनी म्हटले की, दोन खाजगी कंपन्यांनी भागीदारी करावी का किंवा भागिदार कंपनी कशी निवडतात किंवा न निवडतात यात दखल देणे सरकारचे काम नाही. मात्र, सोप्या शब्दात याचा अर्थ असा आहे की दोन्ही कंपन्या आता स्वतंत्रपणे भारतात त्यांची रणनीती पुढे करू शकतात. सेमिकॉन एन इलेक्ट्रॉनिक्समधील योग्य तंत्रज्ञान भागीदारासह भारतात व्यवसाय करू शकतात, असेही त्यांनी म्हटले.

इलेक्ट्रॉनिक्स आणि आयटी राज्यमंत्री राजीव चंद्रशेखर यांनी। पान २ वर

## आता खासगी कार्यालयांमध्ये तंबाखूजन्य पदार्थांचा वापर करण्यावर बंदी

### सार्वजनिक आरोग्य विभागाचे आदेश

मुंबई : सार्वजनिक आरोग्य विभागाकडून शासकीय आणि निमशासकीय तसेच खासगी कार्यालयांमध्ये तंबाखूजन्य पदार्थांचा वापर करण्यावर बंदी घालण्यात आली आहे. तसेच या नियमांचे उल्लंघन केल्यास २०० रुपयांचा दंड देखील आकारण्यात येणार आहे. 'स्वच्छ भारत, स्वस्थ भारत' अभियान महाराष्ट्रात राबवण्याचा निर्णय प्रशासानाकडून घेण्यात आला आहे. परिसर तंबाखूमुक्त करण्यासाठी देखील शासनाकडून आदेश देण्यात आले आहेत. या नियमांची अंमलबजावणी करण्यासाठी जबाबदार व्यक्तीची नेमणूक करण्याचे आदेश देखील शासनाने दिले आहेत. सामान्य नागरिकांना तंबाखूजन्य पदार्थांपासून दूर ठेवण्यासाठी केंद्र शासनाकडून यासंदर्भात आधीच नियमावली जाहीर करण्यात आली आहे. तर याच संदर्भात राज्य शासनाकडून पार पडलेल्या बैठकीमध्ये कठोर नियमांची अंमलबजावणी । पान २ वर


## राज्यपाल नियुक्त १२ आमदारांच्या स्थगितीवर आज सुनावणी

नवी दिल्ली : राज्यपाल नियुक्त १२ आमदारांच्या प्रकरणात उद्याच म्हणजे मंगळवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या पीठासमोर आज केस लिस्ट आहे. सप्टेंबर २०२२ पासून राज्यपाल नियुक्त आमदारांच्या नियुक्तींना कोर्टात स्थगिती देण्यात आली आहे. आता मंगळवारी ही स्थगिती उठणार की कायम राहणार याची उत्सुकता आहे. या आधी न्यायमूर्ती जोसेफ यांच्यासमोर ही केस सुरू होती. पण ते निवृत्त झाल्यानंतर आता ही केस सरन्यायाधीशांसमोर सुनावणीसाठी आली आहे.

राज्यातील राज्यपाल नियुक्त आमदारांच्या यादीबाबतचा घोळ गेल्या तीन वर्षाहून अधिक काळापासून असल्याचं दिसून येतंय. राज्यात महाविकास आघाडी सरकरा सत्तेत आल्यानंतर त्यांनी तत्कालीन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांना १२ सदस्यांची यादी पाठवली. पण राज्यपालांकडून या यादीला ना हिरवा कंदील देण्यात आला, ना यादी मंजूर करण्याबाबत कोणतंही भाष्य करण्यात आलं. या प्रकरणी राज्य सरकारने न्यायालयात याचिका दाखल केल्यानंतरही राज्यपालांनी । पान २ वर

## छगन भुजबळ यांना जीवे मारण्याची धमकी

मुंबई : राज्याचे मंत्री आणि राष्ट्रवादीचे नेते छगन भुजबळ यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. त्यांच्या कार्यालयातील एका कार्यकर्त्यांच्या मोबाईलवर फोन करुन ही धमकी देण्यात आली आहे. धमकी देणाऱ्यानं छगन भुजबळ यांना जीवे मारण्याची सुपारी मिळाल्याचं सांगितलं. दरम्यान, धमकी देणाऱ्याला पुणे पोलिसांकडून अटक करण्यात आली आहे. संबंधित व्यक्तीनं मद्यधुंद अवस्थेत धमकीचा फोन केल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.



छगन भुजबळ काल पुण्यात असताना त्यांच्या कार्यकर्त्याच्या मोबाईलवर फोन आला. फोन करणाऱ्या व्यक्तीनं मंत्री छगन भुजबळांना जीवे मारण्याची सुपारी मिळाल्याचं सांगितलं. धमकी देणाऱ्या व्यक्तीनं स्वतःचं नाव प्रशांत पाटील असल्याचं सांगितलं. त्यानंतर छगन भुजबळ यांच्या कार्यालयाकडून पुणे पोलिसांना तात्काळ या प्रकरणाची सविस्तर माहिती देण्यात आली. पोलिसांनी सर्व तपशी घेऊन तपास सुरू केला. त्यानंतर मोबाईल नंबरच्या आधारे प्रशांत पाटील या व्यक्तीला महाडमधून पुणे पोलीसांनी अटक केली आहे. मद्यधुंद अवस्थेत प्रशांत पाटीलनं मंत्री छगन भुजबळांना धमकी दिल्याचं प्राथमिक तपासात निष्पन्न झाल्याचं पोलिसांनी सांगितलं. आरोपी प्रशांत पाटील मूळचा कोल्हापूरचा आहे.

सोमवारी मंत्री छगन भुजबळ पुण्याला एका कार्यक्रमासाठी गेले होते. । पान २ वर

## वन विभागाने बांधलेल्या कर्जाळ येथील वन कुटीचे आ.सचिन कल्याणशेट्टी यांनी केले उद्घाटन

अक्कलकोट/प्रतिनिधी: अक्कलकोट तालुक्यातील कर्जाळ येथील नियोजित वन पर्यटन केंद्राची पाहणी आज सोमवार दिनांक १० जुलै २३ रोजी अक्कलकोट चे आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांनी केली,आणि या ठिकाणी उभारण्यात आलेल्या वनकुटी चे उद्घाटन ही त्यांनी केलेकर्जाळ येथे वन विभागाने वनकुटी बांधली आहे या वनकुटी चा शुभारंभ आज मान्यवरांच्या उपस्थितीत आ.सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी सोलापूर जिल्हा वनरक्षक धैर्यशील पाटील, यांच्या सह वन विभाग अक्कलकोट चे कर्मचारी श्री. लक्ष्मण आवारे, .दीपक खलाणे, श्री.बाबा हाके,



श्री.दीपक खालणे, श्री.शंकर कुताटे,रमेश कुंभार, गंगाधर विभुते,श्रीशैल पाटील,तुकाराम बादणे, बापू साहेब भोई, श्रीमती अश्विनी सोनके, श्रीमती रेणुका सोनटक्के, श्री मल्लिकार्जुन ढब्बे, अधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.अक्कलकोट तालुक्यात पर्यटनाला चालना मिळावी म्हणून वन विभागाने कर्जाल येथे नवीन वनकुटी बांधली आहे या वनकुटी मूळे अक्कलकोट ला स्वामी समर्थ महाराजांच्या दर्शनासाठी जाणाऱ्या येणाऱ्या भाविकांची सोय होणार आहे अक्कलकोट तालुक्यातील शिरवळ तसेच अक्कलकोट स्टेशन आणि दुधनी रस्त्यावर बिंजगेर येथे अशा वनकुटी उभारण्यात याव्यात अशी मागणी याप्रसंगी अनेकांनी वन विभागाकडे केली .कर्जाळ येथील वन कुटीचे आ.कल्याणशेट्टी यांनी उद्घाटन केल्या नंतर त्यांनी वन विभागात फेरफटका मारून वन आणि संपूर्ण जंगलाची माहिती जाणून घेतली.

## ९ जुलैपर्यंत ५.१७ लाख कोटींची प्रत्यक्ष कर वसुली

नवी दिल्ली : प्रत्यक्ष कर वसुलीत यंदा चांगलीच तेजी असल्याचे चित्र आहे. आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये ९ जुलै २०२३ पर्यंत एकूण कर वसुली ५.१७ लाख कोटी रुपये इतकी झाली आहे. मागील आर्थिक वर्ष २०२२-२३ च्या कालावधीच्या तुलनेत १४.६५ टक्के अधिक आहे. अर्थ मंत्रालयाने याबाबतची आकडेवारी जाहीर केली आहे.

अर्थ मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, प्रत्यक्ष कर संकलनात प्रगती दिसून येत असून आणि ९ जुलैपर्यंत प्रत्यक्ष कर संकलन ५.१७ लाख कोटी रुपये झाले आहे. हे कर संकलन मागील वर्षीच्या याच कालावधीपेक्षा १४.६५ टक्के अधिक आहे. परतावा वगळता, प्रत्यक्ष कर संकलन एकूण ४.७५ लाख कोटी रुपये आहे. मागील वर्षाच्या तुलनेत १५.८७ टक्के अधिक आहे. एक तिमाही आणि काही कालावधीसाठी २०२३-२४ च्या प्रत्यक्ष कर संकलनाच्या अंदाजपत्रकाच्या २६.०५ टक्के अधिक आहे. अर्थ मंत्रालयाने म्हटले की, एक एप्रिल २०२३ पासून ते ९ जुलै २०२३ पर्यंत करदात्यांना ४२ हजार कोटी रुपयांचा रिफंड जारी करण्यात आला आहे. मागील वर्षाच्या याच कालावधीतील रिफंडच्या तुलनेत २.५५ टक्के अधिक आहे. सध्या आयकर भरण्यासाठीची लगबग सुरू आहे. अशातच आयकर विभागाने परदेश दौऱ्यावर सहजपणे जाण्याआधी आयकर रिटर्न भरणे का आवश्यक आहे, याची माहिती दिली आहे.

## अमेरिका पुराच्या विळख्यात; न्यूयॉर्क आणि पेन्सिलवेनिया शहरांत पावसाचा कहर

नवी दिल्ली : अमेरिकेतील न्यूयॉर्क आणि पेन्सिलवेनिया शहरांच्या काही भागात मुसळधार पाऊस सुरू आहे. जोरदार पावसामुळे रस्त्यावर पाणी साचलं आहे. बऱ्याच गाड्या सकल भागात साचलेल्या पाण्यात अडकल्या



आहेत. गाडीतील लोकांना सुखरुप बाहेर काढण्याचं काम सध्या सुरू आहे. मुसळधार पावसामुळे अमेरिकेत पूरजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे.मुसळधार पावसामुळे न्यूयॉर्कसह अमेरिकेतील सर्वच भागात पुराचा कहर पाहायला मिळत आहे. हायलँड फॉल्स, ऑरेंज काउंटी आणि न्यूयॉर्कमध्ये अतिवृष्टीमुळे अचानक पूर आला. न्यूयॉर्क शहराच्या उत्तरेला हडसन व्हॅली क्षेत्राचं प्रतिनिधीत्व करत असलेल्या माईक लॉलर यांनी ट्विटरवर मुसळधार पावसाचे अनेक व्हिडीओ आणि फोटो पोस्ट केले आहेत. मॅनहट्टनपासून ४० मैल लांब असलेल्या स्टोनी पॉईंट शहरात पुराचं पाणी दिसून येत आहे. स्टोनी पॉईंट शहरात आलेल्या पुरामुळे लोकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात येत आहे. त्याचबरोबर कोणताही अनुचीत प्रकार घडू नये म्हणून पोलिसांनी पूरस्थिती लक्षात घेऊन रस्ते बंद केले आहेत. त्याच वेळी, लोकांना उच्च उंचीच्या भागात जाण्याचं आणि बोगद्याच्या मार्गाने न जाण्याचं आवाहन केलं आहे

अमेरिकेतील पेन्सिलवेनिया शहरात पूरजन्य स्थिती निर्माण झाली आहे. एलन टाऊनपासून जवळपास १५ मैलावर असलेल्या दक्षिण-पुर्वेकडील क्वेकर टाऊनमधील रस्ते जलमय झाली आहेत. क्वेकर टाऊनलाही पुराचा वेढा आहे.

राष्ट्रीय हवामान विभागात काम करणारे हवामानशास्त्रज्ञ ब्रायन । पान २ वर

# आहिरे स्पर्धा परीक्षा कॅडमीचे प्रमुख प्रा.डॉ.आनंद रत्नाकर आहिरे यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यस्तरीय कवी संमेलन व गुणवंतांचा सन्मान सोहळा संपन्न

नाशिकः प्रा.डॉ.विठ्ठल शिंदे यांना जीवन गौरव पुरस्कार प्रदान तर सुप्रसिद्ध अभिनेत्री अर्चना नेवरेकर यांना उत्कृष्ट अभिनेत्री व निर्माती पुरस्कार सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आले.सर्व कवी,साहित्यिकांना व कार्यवीरांना हक्काचे विचारपीठ मिळावे हीच सद्भावना. राणी भवन हॉल अशोक स्तंभ येथे प्राध्यापक डॉक्टर आनंद रत्नाकर आहिरे यांच्या ३५ व्या वाढदिवसानिमित्त राज्यस्तरीय कवी संमेलन व गुणवंतांचा सन्मान सोहळा आयोजित केला होता या कार्यक्रमास कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक, विचारवंत,कवी प्रा. डॉ.विठ्ठल शिंदे होते तर प्रमुख पाहुणे सुप्रसिद्ध अभिनेत्री व निर्माती मा.अर्चना नेवरेकर व ज्येष्ठ साहित्यिक, विचारवंत, लेखक प्रा. डॉ.शंकर बोराडे होते तसेच नाशिक मधील सुप्रसिद्ध ज्वेलर्सचे मालक मा.सागर आडगावकर उपस्थित होते.

सुरुवातीला पाहुण्यांच्या हस्ते महापुरुषांचे प्रतिमा पूजन झाले नंतर प्राध्यापक डॉक्टर आनंद आहिरे यांचे औक्षण करून केक कापला नंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष व पाहुण्यांचा प्राध्यापक डॉक्टर आनंद आहिरे यांनी सन्मानचिन्ह सन्मानपत्र मानाची शाल देऊन यथोचित सन्मान केला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राध्यापक डॉक्टर आनंद रत्नाकर आहिरे यांनी केले त्यांनी सुरुवातीला सर्वांचे धन्यवाद व्यक्त केले की इतक्या मोठ्या प्रमाणात सर्व क्षेत्रातील लोक त्यांच्यावर अपार प्रेम करतात त्या प्रेमापोटीच सगळेजण या ठिकाणी उपस्थित झालात ज्यांनी त्यांना महाविद्यालयीन जीवनात घडवले असे प्राध्यापक विठ्ठल शिंदे सर हि त्यांचेही त्यांनी धन्यवाद व्यक्त केले. महाराष्ट्रातील अनेक संस्थांनी मिळून आज वाढदिवस साजरा करत आहे ही मोठी आनंदाची गोष्ट आहे तसेच पुष्परत्न बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व पुष्परत्न साहित्य समूह यांचे आतापर्यंतचे विनामूल्य कार्य त्यांनी नमूद केले. व भारतामध्ये कवी व कलावंतच परिवर्तन करू शकता हेही त्यांनी तत्त्ववेता ॲरिस्टॉटल चे उदाहरण देऊन त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सुप्रसिद्ध अभिनेत्री अर्चना नेवरेकर यांनी प्राध्यापक डॉक्टर आनंद आहिरे यांचे कार्य अनमोल आहे प्रत्येकाच्या जीवनात आनंद भरणे हे कोणालाही जमत नाही ते अविरतपणे प्राध्यापक डॉक्टर आनंद करत आहे. हजारो पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना घडवण्याबरोबरच साहित्यिकांनाही विनामूल्य हक्काचे विचारपीठ उपलब्ध करून देतात हे खरोखरच नोंद घेण्यासारखे आहे त्यांनी भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

ज्येष्ठ साहित्यिक विचारवंत लेखक प्राध्यापक डॉक्टर शंकर बोराडे यांनी पुष्परत्न साहित्य समूह आहिरे स्पर्धा परीक्षा कॅडमी व हे बघत असताना प्राध्यापक डॉक्टर आनंद आहिरे यांनी नाशिक मध्ये येऊन दर महिन्याच्या पहिल्या रविवारी विनामूल्य कवी संमेलन व गुणवंतांचा सन्मान सोहळा आयोजित करता हे खरोखर वाखाणण्यासारखे आहे. आणि उदंड प्रतिसादासह प्रत्येक महिन्याला महाराष्ट्रातून कवी साहित्यिक या संमेलनाला येत असतात ही माणसं जोडण्याची कला प्राध्यापक डॉक्टर आनंद आहिरे यांना जमली. नाशिक हे साहित्य व संस्कृतीचे केंद्र आहे त्यामुळे प्राध्यापक डॉक्टर आनंद रत्नाकर आहिरे साहित्यिकांसाठी व कवींसाठी नवनवीन संकल्पना राबवून संस्कृती जिवंत व वाढवण्याचे काम करत आहे.

सागर आडगावकर ज्वेलर्सचे मालक माननीय सागर आडगावकर यांनी प्राध्यापक डॉक्टर आनंद अहिरे हे एक अष्टपैलू व्यक्तिमत्व आहे. महाराष्ट्रातील कवी साहित्यिकांना विनामूल्य हक्काचे विचारपीठ उपलब्ध करून देणे आणि ती सेवा अविरतपणे चालू ठेवणे हे मोठ्या उदार अंतकरणाचे व्यक्तीच करू शकतात ते प्राध्यापक डॉक्टर आनंद आहिरे करत आहेत इतरांच्या जीवनात व



चेहऱ्यावर आनंद फुलवण्याचे काम अहिरे सर करत आहे त्यांच्या या कार्यात खूप खूप शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. डॉ. विठ्ठल शिंदे यांनी प्रा. डॉ. आनंद रत्नाकर हे महाविद्यालय जीवनापासून ते आतापर्यंत उंच शिखरावर गेले त्यांचा मी स्वतः पाहिलेला आहे प्राध्यापक डॉक्टर आनंद रत्नाकर अहिरे हे एक पाठी असून त्यांची स्मरणशक्ती अतिशय दांडगी आहे ते नेट परीक्षा पास झाल्यावर महाविद्यालयात प्राध्यापक झाले असते पण ते न होता त्यांनी आज जे हजारोच्या वरती विद्यार्थी स्पर्धा परीक्षेत उत्तीर्ण केले ती अतिशय मौलिक कामगिरी आहे. त्यांच्या प्राध्यापक सेवा कार्यात आतापर्यंत जितके विद्यार्थी घडून गेले व काहींनी अत्युच्च स्थान गाठले त्यामध्ये प्रथम क्रमांक प्राध्यापक डॉक्टर आनंद अहिरे यांचा लागतो यावेळी त्यांनी आवर्जून नमूद केले.

महाराष्ट्रातील विविध ठिकाणाहून आलेल्या कार्यवेरिंना राज्यस्तरीय पुरस्कार सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. त्यामध्ये १)-प्राध्यापक डॉक्टर विठ्ठल शिंदे यांना सन्मानपूर्वक (जीवन गौरव पुरस्कार) प्रदान करण्यात आला. पुरस्काराचे स्वरूप रोख २०००रु. सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, मानाची शाल व पुस्तक. २)-सुप्रसिद्ध अभिनेत्री अर्चना नेवरेकर यांना उत्कृष्ट अभिनेत्री व निर्माती हा पुरस्कार सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला पुरस्काराच्या स्वरूप रोख २०००रु. सन्मान चिन्ह,सन्मानपत्र, मानाची शाल व पुस्तक, त्यानंतर सर्व कार्यवीरांना पुरस्कार सन्मानपूर्वक प्रदान केला पुरस्काराचे स्वरूप सन्मान चिन्ह सन्मानपत्र मानाची शाल व पुस्तक त्यामध्ये ३)-मा. कल्पेश कुमार चव्हाण(झडख) नाशिक ग्रामीण उत्कृष्ट प्रशासकीय अधिकारी, ४)-मा. काजल नागरे(STI,GST भवन)नाशिक, उत्कृष्ट प्रशासकीय अधिकारी ५)- प्रा.निशांत गुरु,पुष्परत्न गझलकार,६)- मा. संदेशा पाटील नाशिक,उत्कृष्ट अभिनेत्री, ७)-मा. अरुण घोडेराव नाशिक, पुष्परत्न काव्य गौरव,८)-मा. सुभाष सबनीस नाशिक, राज्यस्तरीय उत्कृष्ट प्रकाशक,९)-पांडुरंग कुलकर्णी नाशिक, पुष्परत्न काव्य गौरव,१०)- अजय बिरारी नाशिक, राज्यस्तरीय पुष्परत्न उत्कृष्ट गझलकार

११)- मा. पूनम मोहिते, नाशिक सेट परीक्षा उत्तीर्ण २०२३ १२)-धनंजय चतुर, नाशिक, राज्यस्तरीय समाजसेवा,१३)-मा. काशिनाथ माटल, मुंबई, राज्यस्तरीय उत्कृष्ट कथालेखन. असे विविध राज्यस्तरीय पुरस्कार मान्यवरांच्या शुभ हस्ते सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आले.त्यानंतर कवी संमेलनाचे अध्यक्ष प्रा. डॉ. विठ्ठल शिंदे हे होते तर प्रमुख पाहुणे प्रा.निशांत गुरु सुप्रसिद्ध गझलकार नाशिक, संजय गोरडे सुप्रसिद्ध गझलकार नाशिक व बाळासाहेब गिरी सुप्रसिद्ध कवी नाशिक हे उपस्थित होते. महाराष्ट्राच्या विविध ठिकाणाहून ५७ कवी कवयित्री यांनी प्राध्यापक डॉक्टर आनंद रत्नाकर आहिरे यांच्या जीवनावर बहारदार कविता सादर केल्या त्यामध्ये प्रा.राजू लहिरे,मनमाड, मनीषा बिराडे जळगाव, सुजाता कोटकर जळगाव, साहिल गांगुर्डे नाशिक, संतोष साळवे नाशिक,माणिक गोडसे नाशिक संजय आहेर नाशिक, काशिनाथ जाधव नाशिक, शीला पाटील नाशिक, रवींद्र पाटील नाशिक, सीमा राणी बागुल नाशिक, सोमदत्त मुंजवाडकर सटाणा, कविता बिरारी नाशिक, ऋषिकेश भालेराव गीताश्री नाईक मुंबई आदींच्या कवितेला प्रचंड प्रतिसाद मिळाला तरी इतरांच्या कविताही सुंदर झाल्या तसेच जळगाव, मुंबई, अमरावती, पुणे, बीड, पालघर, छत्रपती संभाजी नगर व नाशिक जिल्ह्यातील विविध तालुक्यातून कवी कवयित्री विचारवंत साहित्यिक लेखक वाचक प्राध्यापक वृंद नातेवाईक मित्रमंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.संपूर्ण कार्यक्रमाचे सुंदर सूत्रसंचालन मा.मनीषा कापुरे नाशिक यांनी केले तर कवी संमेलनाचे सूत्रसंचालन प्रा. सरिता खोबरे अमरावती यांनी केले. तर आलेल्या सर्वांचे आभार प्राध्यापक डॉक्टर आनंद रत्नाकर आहिरे यांनी मानले.

# तुळजापूर तालुक्यातील बोरगाव व सलगरा (म) येथे शेतकरी मेळाव्याचे आयोजन

तुळजापूर/प्रतिनिधी :बोरगाव व सलगरा (म) ता. तुळजापूर येथे शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे



अफार्म पुणे व परिवर्तन सामाजिक संस्था नळदुर्ग यांच्या संयुक्त विद्यमाने तृणधान्य प्रोत्साहन अभियानांतर्गत शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे

या मेळाव्यात भरड धान्य व त्याचे आपल्या आहारातील महत्व या विषयावर तज्ञ साधन व्यक्ती कडून मार्गदर्शन करण्यात येणार आहे.अंतरराष्ट्रिय मीलेट वर्ष जगभरात साजरा केला जात आहे. त्याचा एक भाग म्हणून वरील दोन गावात शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे

त्याचे निमंत्रण आज तुळजापुर तालुका कृषी अधिकारी मा. अवधूत मुळे साहेब यांना देण्यात आले आहे या मेळाव्याचे उद्घाटन ते स्वतः करणार आहेत या कार्यक्रमासाठी कृषि सहाय्यक, कृषि पर्यवेक्षक, ग्रामसेवक,सर्व शेतकरी सहभागी होणार आहेत .या शेतकरी मेळाव्यात शेतकऱ्यांना भरड धान्य चे किट ही वाटप करण्यात येणार आहे. अशी माहिती परिवर्तन सामाजिक संस्था नळदुर्ग चे सचिव मारुती बनसोडे यांनी दिली आहे

# अजित पवार यांच्या मातोश्री आशाताई पवार यांनी घेतले विठ्ठल रुक्मिणीचे दर्शन



पंढरपूर/प्रतिनिधी : मातृ सुरक्षा दिना चे औचित्य साधून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मातोश्री आशाताई पवार यांनी विठ्ठल रुक्मिणीचे दर्शन घेतले अजित यांची प्रगती होऊ दे असे साखडे विठ्ठल रुक्मिणीला घातली असल्याची माहिती अशातही पवार यांनी पत्रकारांना दिली आषाढी यात्रेसाठी येताना संत तुकाराम महाराज पालखी सोहळा बारामती येथे आला होता यावेळी पवार कुटुंबीय भाविकांची सेवा केली त्यांचे फळ म्हणून आषाढी एकादशी सोहळा झाल्यानंतर अजित पवार यांची उपमुख्यमंत्री पदी निवड झाली

म्हणून आशाताई पवार म्हणाल्या की अजित अशीच प्रगती होत जावो म्हणून आपण विठ्ठलाच असे साकडे घातले आहे

# श्री माणकेश्वर वाचनालय वाचन संस्कृतीचा अप्रतिम ठेवा : मुकुंदराजे होळकर

## श्री माणकेश्वर वाचनालयाचा १०४ वा वर्धापन दिन मोठया उत्साहात साजरा



निफाड/राजेंद्र थोरात :आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगामध्ये अमूलाग्र बदल होत असताना आजही समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत १०४ वर्षापासून यशस्वीपणे निफाडची वाचन चळवळ जोपासणारे श्री माणकेश्वर वाचनालय म्हणजे वाचन संस्कृतीचा अप्रतिम ठेवा असल्याचे प्रतिपादन निफाडचे माजी नगराध्यक्ष मुकुंदराजे होळकर यांनी केले,ते श्री माणकेश्वर वाचनालयाच्या १०४ वा वर्धापन दिनानिमित्त बोलत होते,

यावेळी सकाळी वाचनालयाचे सहचिटणीस राहूल दवते व पल्लवी दवते यांचे हस्ते श्रीसत्यनारायण पुजन करण्यात येऊन संस्थापक कै. चिंतामणराव गाडगीळ,कै.भाऊसाहेब उगांवकर,कै.विष्णूपंत सोनवणी यांच्या प्रतिमा पूजन व निफाड चे भूमीपूत्र सर्वोच्य न्यायालयाचे पहिले मराठी न्यायाधिश न्या.महादेव गोविंद रानडे यांच्या पुतळ्याचे पूजन माजी नगराध्यक्ष मुकुंदराजे होळकर,माजी नगरसेवक दिलीप कापसे,ओमसाई सर्व्हेअरचे संचालक विजय धारराव,करंजी खुर्दचे माजी सरपंच प्रकाश अडसरे यांच्या हस्ते संपन्न झाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविकात वाचनालयाचे अध्यक्ष मधुकर शेलार यांनी वाचनालयाच्या वाटचालीत येणाऱ्या अडचणी व प्रगती विषयक माहिती उपस्थितांना दिली.प्रकाश अडसरे यांनी मनोगत व्यक्त करतांना ग्रामीण भागात या वाचनालयाने १०४ वर्षे पूर्ण केली व आपले वाचनालय सातत्याने अनेक कार्यक्रम राबवित आहे ही विशेष बाब असल्याचे नमूद करून वर्धापन दिनाच्या शुभेच्छा दिल्या.यानंतर वाचनालयाचे आजीव सभासद प्रविण तनपूरे यांनी निफाड ते पंढरपूर सायकल वारी व एका वर्षांत १२५०० किमी सायकलिंग राईड केल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.


याप्रसंगी वाचनालयाच्या उपाध्यक्षा मेघा जंगम, चिटणीस बाळासाहेब कापसे, सहचिटणीस राहूल दवते, हिशोब तपासणीस दत्ताकाका उगांवकर, संचालक तन्वीर राजे, सुहास सुरळीकर, ग्रंथमित्र नईमखान पठाण, बाळासाहेब कर्डिले, महेश बनकर, सुजाता तनपूरे, राजेंद्र सोमवंशी, सुनिल चिखले,स्व शांतीलाल सोनी निफाड नागरी पतसंस्थेचे संचालक संपतराव कराड, मधुकर राऊत,जेष्ठ नागरिक संपतराव धारराव, सुभाष कुंदे,रघूनाथ कुंदे, विश्वासराव नवले,, आनंद सुर्यवंशी, अमोल साबळे,शरदचंद्र रोकडे, सभासद संजय घुमरे,विजय डेर्ले, ग्रंथपाल ग्रंथमित्र बाळासाहेब खालकर, नितीन बनसोडे, कोमल खालकर, संगीता कापडी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चिटणीस बाळासाहेब कापसे यांनी तर आभार ॲड.प्रविण ठाकरे यांनी मानले.

# होटगी च्या जि.प.प्रा शाळेत विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजनात मिठाईचे वाटप

अक्कलकोट/प्रतिनिधीः दक्षिण सोलापूर तालुक्यातील जि.प प्रा मराठी शाळा होटगी स्टेशन येथील सर्व विद्यार्थ्यांना आज सोमवारी शालेय पूरक पोषण आहार योजना मध्ये सोलापूर मधील प्रसिद्ध अन्नपूर्णा स्वीट होम मधील बालुशाही चे वाटप करण्यात आली शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षक उपस्थित होते. जि.प.प्राथ. मराठी शाळा होटगी स्टेशन येथे विश्व पर्यावरण दिवस निमित्त एन . टी . पी .सी . कडून चित्रकला स्पर्धा घेऊन , स्पर्धेत भाग घेतलेल्या विद्यार्थ्यांमधून ५ विद्यार्थ्यांना पारितोषक वितरीत करण्यात आले,या कार्यक्रमास एनटिपीसी येथील अधिकारी उपस्थिती राहून विद्यार्थ्यांना पर्यावरण विषयीची माहिती दिली. मुख्यापक श्री. देशमुख सर यांनी पर्यावरण संवर्धन विषयी सखोल मार्गदर्शन केले. शेवटी आभार प्रदर्शन श्रीम. दहिफळे मॅडम यांनी केले. श्री. साई माऊली सेवा संस्था मुंबई यांच्या मार्फत कै.हरेश परब यांच्या स्मरणार्थ जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा होटगी स्टेशन येथील विद्यार्थ्यांना वह्या व बॅग वाटप करण्यात आले.



# शब्दकोडे क्र ५५



आडवे शब्द १. मुंबईत २००८ साली झालेल्या अतिरेकी हल्ल्यात वीरगती प्राप्त झालेले तीन प्रमुख अधिकारी ३. अनाथ ११. कारस्थान १२. खंदक १३. अंड्यातील पिवळा भाग १५. मलईदार बासुंदी १७. धोबी १९. गुजराथी नृत्यप्रकार २२. वितरण २३. फळातील द्रव २४. कोलकाताचे विमानतळ २७. ठावठिकाणा २८. युवक २९. विचित्र ३१. बांबूचे कुसळ ३२. केस काळे करण्याचे साधन ३४. गर्दभ ३५. दयाळू ३७. कोर्टातील दावा ३८. बारीक दगड ३९. हट्टी, दुराग्रही ४१. शिखर,ढिगाचा चिंचोळा भाग ४३. बडबड्या ४४. धडक ४८. शाहिरजवळचे एक छोटे चर्मवाद्य ५०. कापडी बंद, फत ५१. एक ध्वज, एक रंग ५२. कडू ५३. खांद्यावरून घेण्याचे वस्त्र ५४. एक सुगंधी पांढरे फूल ५५. नम्र, वाकलेला ५७. काम लांबणे ५९. नुकताच सरलेला दिवस ६०. परीक्षा, निवड ६२. कठीण प्रसंग ६३. वाद्य वाजवणारा ६५. एका घराण्याचे राज्य ६७. प्रश्न ६९. रम्य ७१. कुत्रा ७३. मध्यस्थ ७५. रुचीहीन ७७. पाठोपाठ ७८. पटल ७९. गाव, नगर ८०. मृत्यूदेवता ८२. रक्षण करणारा ८३. आणि ८४. उत्कर्षाचा काळ उभे शब्द १. बांगड्यांचा व्यवसाय करणारा २. छोटा डोंगर ३. बक्षीसाचा पल्ला ४. पदार्थ शिजतानाचा आवाज ५. सारक ६. तात्पर्य ७. कसदार ८. खोडण्याचे साधन ९. कुबड १०. शरीर १४. लुच्चा १६. फासळी १८. जपजाप्य १९. ढीग २०. नड २१. विहीर २२. दुर्गंधी येऊ लागलेला २३. तोफगाडी २५. सुगंधी पाने २६. अंतःकरण २७. नमुनेदार २९. अपमान ३०. वाईट याअर्थी लागणारा प्रत्यय, उदा.कुख्यात ह्व नाम ३३. कपाळ ३६. सुदैवी ३७. चिकटविण्यासाठी वापरला जाणारा एक पदार्थ ३८. शाब्दिक हजामत ४०. मातीमोल ४२. मगज ४६. शरीर, अवयव ४७. हुशार, चुणचुणीत ४९. लोकर (इंग्रजी) ५१. लवकर, वेगाने ५३. मेहरबानी ५६. सर्वनाश (हिंदी) ५७. पहारेकरी ५८. झाकणाचे पात्र ५९. कावळा ६१. आवड, रुची ६३. किराणा व्यापारी ६४. कीव करण्याजोगे ६५. ढग, दाट ६६. शाळेतील शिक्षक ६८. सत्ता ७०. सुसर ७१. नाकावाटे हवा घेणे ७२. जनावर ७४. दहाचा संच ७६. वाळूवर रेघा ओढून भविष्य सांगणे ८१. मयूर

# राहुल गांधी यांच्यावर जेवढा दबाव टाकाल त्याच्या दुप्पट जोमाने भाजपविरोधात उभे राहतील : आ.प्रणिती शिंदे

### भाजपने महाराष्ट्रात अस्थिर सरकार स्थापन करून लोकशाहीचा खून केला.

## बी.आर.एस चा तेलंगणात पराभव होत असताना महाराष्ट्रात येऊन सत्तेचे स्वप्न पाहत आहे, बी.आर.एसने आधी आपले घर सांभाळावे.



सोलापूर/प्रतिनिधीः काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावर भाजपच्या वतीने खोटा गुन्हा दाखल केल्यामुळे गुजरात मधील न्यायालयाने दोन वर्षे शिक्षा दिली. त्याविरुद्ध उच्च न्यायालयात आव्हान दिले असता स्थगिती देण्यास नकार दिली. भाजपा आणि मोदी सरकार विरोधात बोलणाऱ्यांवर खोट्या केसेस करून त्यांचे तोंड बंद करण्याची गुजराती स्टाईल, आणि लोकशाहिचा गळा घोटण्याऱ्या भाजप आणि मोदी सरकार विरोधात महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी कार्याध्यक्षा आमदार प्रणिती शिंदे यांच्या उपस्थितीत शहराध्यक्ष चेतन नरोटे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा परिषद पूनम गेट येथे सोलापुर शहर काँग्रेसच्या वतीने निदर्शने आंदोलन करण्यात आले. यावेळी राहुलजी गांधी यांच्या समर्थनार्थ आणि मोदी सरकारच्या विरोधात जोरजोरात घोषणाबाजी करण्यात आली.

यावेळी बोलताना आमदार प्रणिती शिंदे म्हणाले की, काँग्रेसचे नेते राहुलजी गांधी यांच्या झंझावतामुळे नट्टापट्टा करत देशात परदेशात नेहमीच खोटे बोलणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपच्या पायाखालची वाळू सरकली, अनेक राज्यात त्यांचा पराभव होत आहे. त्यामुळे घाबरून जाऊन राहुलजी गांधी यांची खासदाराकी रद्द केली त्यामुळे राहुलजी गांधी घाबरले नसून उलट अजुन जोमाने काम करीत आहेत. मोदी सरकारमुळे जनतेला त्रास होत असून महागाई, बेरोजगारी, प्रचंड वाढले असताना जनतेच्या प्रश्नांकडे लक्ष न देता नरेंद्र मोदीनी ज्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप केले त्यांच्याबरोबरच अभद्र युती करून महाराष्ट्रात सत्ता स्थापन करून लोकशाहिचा खून केला. हे सरकार जास्त दिवस ठिकणार नाही. लोकांचा कल बदलत आहे. महाराष्ट्रात काँग्रेस पक्षच स्थिर सरकार देऊ शकेल. समाजातील नागरिक, व्यापारी, पत्रकारांसह, काँग्रेस कार्यकर्ते आणि सर्व घटक एकत्र येऊन लढायचे आहे. भाजपा सत्तेसाठी काहीही करायला तयार असते म्हणून जनतेने सावध राहिले पाहिजे. सोलापुरात सुद्धा राजकीय स्वार्थासाठी षडयंत्र रचले गेले होते पण सोलापुरची जनता त्यास बळी पडली नाही. तसेच तेलंगणात इठड पार्टीचा पराभवाचा सर्व्हे समोर आला असताना सुद्धा महाराष्ट्रात, सोलापुरात येऊन सत्तेचे स्वप्न पाहत आहेत त्यांच्यापाठिमागे कोण आहेत हे बघायला पाहिजे.

या आंदोलनात आमदार प्रणिती शिंदे, शहर अध्यक्ष चेतन नरोटे, मा. बाबा मिस्त्री, नगरसेवक प्रवीण निकाळजे, तौफ़ीक़ हत्तूरे, विनोद भोसले, नरसिंग कोळी, मा. नगरसेविका सुशिलाताई आबूटे, अनुराधा काटकर, फिरदौस पटेल, वैष्णवीताई करगुळे, महिला अध्यक्षा प्रमिला तुपलवंडे, प्रवक्ते अशोक निंबर्गी, प्रदेश चिटणीस किसन मेकाले, नरसिंह आसादे, अँड मनीष गडदे, युवक अध्यक्ष गणेश डोंगरे, अंबादास बाबा करगुळे, अल्पसंख्यांक अध्यक्ष जुबेर कुरेशी, वसिम पठाण, ब्लॉक अध्यक्ष देवाभाऊ गायकवाड़, अरुण साठे, मध्य युवक अध्यक्ष वाहिद बिजापुरे, सेवादल अध्यक्ष भीमाशंकर टेकाळे, हेमाताई चिंचोळकर, दत्तू बंदपट्टे, विश्वनाथ साबळे, मकबूल मोहोळकर, राजन कामत, नागनाथ कदम, पशुपती माशाळ, शकील मौलवी, छघ क्षीरसागर, अंबादास गुत्तिकोंडा, जेम्स जंगम, आशाताई म्हेत्रे, सुमन जाधव, अश्विनी जाधव, अमोल भोसले, अनिल मस्के, भारती इप्पलपल्ली, अरुणा वर्मा, तिरुपती परकीपंडला, दिनांनाथ शेळके, श्रीकांत वाडेकर, प्रवीण वाले, वैभव पाटील, हारून शेख, नूरअहमद नालवार, संजय गायकवाड़, समीर काझी, युवराज जाधव, विवेक कन्ना, राजेंद्र शिरकुल, शोभा बोबे, हाजी मैनुद्दीन शेख, अनिल जाधव, अरमान पटेल, सागर शहा, रमेश जाधव, परशुराम सतारेवाले, राजू हुंडेक़री, सुभाष वाघमारे, नामदेव फुलारी, लता गुंडला, मुमताज तांबोळी, रवि आंबेवाले, अनुपम शहा, शकील शेख, अप्पासाहेब बगले, शिल्पा चांदने, नागनाथ शावने, शिवशंकर अंजनाळकर, सत्यनारायण संगा, रुकैयाबानु बिराजदार, बसंती सालुंखे, लता सोनकांबले, एजाज बागवान, धीरज खंदारे, सायमन गट्टू, प्रकाश गेंटयाल, रुस्तम कंपली, नासिर बंगाली, शोहेब महागामी, बालाजी जाधव, लखन गायकवाड़, करीमनिस्सा बागवान, संघमित्रा चौधरी, श्रीशैल रणदिवे, दिनेश म्हेत्रे, भाग्यश्री कदम, दाऊद नदाफ, सलीम मनुरे, नीता बनसोडे, अरुणा भालेराव, कालिदास काळपगार, मेघश्याम गौड़ा, चंद्रकांत टिकके, हनमंतु रूपनर, जब्बार शेख, मनोहर चकोलेकर, चंदाताई काळे, मुमताज शेख, हुस्नाबानो चंडरकी, विजयालक्ष्मी झाकने, करीम शेख, शकूर शेख, सुनीता बेरा, शनैश्वर आसादे, राहुल पाटील, दयानेश्वर जाधव, शिवाजी धोत्रे, मनोहर सालुंखे, संतोष शिरकुल, गोविंद व्हरगंटी, डी बी मस्के, यांच्यासह शेकडो पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# सांगोला धाराशिव साखर कारखान्याचे मिल रोलर पूजन संपन्न

### अभिजीत पाटील यांचेकडून ४ लाख मे.टन गाळपाचे उद्दीष्ट



पंढरपूर/प्रतिनिधीः सांगोला तालुक्यातील धाराशिव साखर कारखाना युनिट नंबर ४ची आगामी सन २०२३ते २०२४या सालातील गळीत हंगामाची तयारी सुरू झाली आहे. यासाठी सोमवारी या कारखान्याचे मिल रोलर पूजन सहकार शिरोमणी कारखान्याचे मा.संचालक श्री.दिपक पवार व त्याच्या सुविद्य पत्नी सौ.मधुराताई यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी चेअरमन अभिजीत पाटील यांनी याआगामी हंगामात कमीत कमी चार लाख गाळप करण्याचे उद्दीष्ट ठेवले असल्याचे जाहीर केले. यावेळी कारखान्याचे कार्यकारी संचालक अमर पाटील,जनरल मॅनेजर रवींद्र साळुंखे, चिफ इंजिनिअर श्री. सगरे, मुख्य शेतकी अधिकारी जमीर काझी, चीफ केमिस्ट श्री.आवळे ,चीफ अकाऊंट अजित घोडे, उप शेती अधिकारी सुनिल मासाळ, तसेच उपखाते प्रमुख सर्व कर्मचारी, कामगार वर्ग उपस्थित होते.हा कारखाना बारा वर्ष बंद होता. तो अभिजीत पाटील यांनी आपल्या धाराशिव युनिट नंबर ४म्हणून आपल्याकडे घेतला. अवघ्या ३५दिवसात बंद अवस्थेत असलेला हा कारखाना सुरू करून मागील दोन वर्ष गाळप केले आहे. हा तिसरा गाळप हंगाम सुरू करण्यासाठी जोरदार तयारी सुरू केली आहे. यामुळे सांगोला तालुक्यासह इतर भागातील ऊस गाळपचा मोठा प्रश्न मिटणार आहे.

# इटकूर प्रशालेत नवोदय-शिष्यवृत्ती, सैनिक स्कूल परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



कळंब/प्रतिनिधी : जि.प.प्रशाला इटकूर येथे सोमवार १०जुलै रोजी इटकूरमधील सर्व नवोदय-शिष्यवृत्ती, सैनिक स्कूल, एन. एम. एम. एस. परीक्षांमध्ये यशस्वी झालेल्या एकूण २१ विद्यार्थ्यांचा विविध पारितोषिके देऊन गुणगौरव करण्यात आला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून कसबे तडवळे येथील रहिवासी व सध्या अमेरिका येथे टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस कंपनीचे डिलिव्हरी पार्टनर या पदावर कार्यरत असणारे प्रदीप पाटील तसेच हसेगाव येथील फुफ्फुस व छाती रोग तज्ञ डॉ. अभिजीत यादव उपस्थित होते.

या वेळी प्रशालेतील विद्यार्थ्यांनी गतवर्षी नवोदय, शिष्यवृत्ती, सैनिक स्कूल, एन.एम.एम.एस. या सर्व परीक्षांमध्ये भरघोस यश मिळवत कळंब तालुक्यातील प्रथम क्रमांकाची शाळा म्हणून नावलौकिक मिळवला. यामध्ये प्रशालेचे एकूण २१ यशवंत विद्यार्थ्यांचा भरीव शालेयोपयोगी साहित्य देऊन सन्मान करण्यात आला. याप्रसंगी अतिथी प्रदीप पाटील यांनी बुद्धिमत्ता आणि गणित या विषयांच्या जोरावर कोणत्याही स्पर्धेत यश मिळवता येईल, असा कानमंत्र विद्यार्थ्यांना दिला तर डॉ. अभिजीत यादव यांनी कोणत्याही कामातील सातत्य आणि ध्येयनिष्ठा हेच यशाचे रहस्य आहे, असा संदेश उपस्थित विद्यार्थ्यांना आपल्या मार्गदर्शनातून दिला.

यावेळी प्रशालेतील नवोदय-शिष्यवृत्ती परीक्षांमध्ये यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये रिया कोठावळे, सिद्धी कानडे, संस्कृती भारती, समर्थ मिटकरी, सिद्धी पावले, आदिती आडसूळ, चैतन्य गंभीरे, रिया आडसूळ, वैभवी जाधव, आरोही शिंदे, स्नेहा फरताडे, आदित्य आडसूळ, कृष्णा गंभीरे, गोविंद जाधव, स्वराली वाघमारे या विद्यार्थ्यांचा भरघोस बक्षिसे देऊन गौरव करण्यात आला. बक्षिसासाठी पालकामधून सुमारे २१००० लोकवाटा जमा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष हरिदास पावले हे होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीम. अंजली यादव यांनी केले तर प्रास्ताविक मुख्याध्यापक तुकाराम गरुडे यांनी केले. आभार सहशिक्षक चंद्रकांत शिंदे यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक अनिल क्षिरसागर, गणेश कोठावळे, वृषिकेत चौधरी, श्रीराम मुंढे, श्रीमती काझी, श्रीमती आडसूळ, लक्ष्मण आडसूळ, सचिन गंभीरे, अभयसिंह आडसूळ, वल्लभ पोते, विजय देसाई, गोपाळ नांदुरे आदींनी परिश्रम घेतले.

# विधीसेवा समिती मार्फत विद्यार्थींना मार्गदर्शक शिबीर

पंढरपूर/प्रतिनिधीः किमान समान शिबीरा अंतर्गत कवठेकर प्रशाला, पंढरपूर येथे तालुका विधीसेवा समिती मार्फत शनिवार, दिनांक १० जुलै, २०२३ रोजी विद्यार्थी करीता मार्गदर्शक शिबीर आयोजन करण्यात आले होते.प्रमुख



जिल्हा न्यायाधीश सलमान आझमी, सोलापूर, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव नरेंद्र जोशी,. जिल्हा न्यायाधीश एम. बी. लंबे, पंढरपूर यांच्या मार्गदर्शनाखाली न्यायाधीश एम. आर. कामत यांच्या अध्यक्षतेखाली कायदेविषयक शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीरास न्यायाधीश श्री. एम. आर. कामत यांनी मुला व मुलींना शिक्षणाचे महत्व पटवुन दिले. मुलींना स्वतंत्र्य जीवन जगण्याचा अधिकार आहे परंतु ते जीवन जगताना दिलेल्या स्वातंत्र्याचा दुरुपयोग होऊ नये असे सांगितले. तसेच सदर शिबीरामध्ये मुलींच्या शिक्षणाच्या अधिकाराबद्दल महत्व सांगणारी दिग्दर्शक अमित काटकर, सांगली यांचा खिडकी हा लघुपट दाखवण्यात आला.

कायदेविषयक शिबीराची प्रस्तावना पंढरपूर अधिवक्ता संघाचे अध्यक्ष ॲड. अर्जुन पाटील व सूत्रसंचालन सहशिक्षक श्री. एन. जी. कुलकर्णी व आभार सौ. एस. आर. कुलकर्णी यांनी केले.कवठेकर प्रशालेचे प्राचार्य श्री. पाटील विधी सेवा समितीचे विधीस्वयंसेवक सुनिल यारगट्टीकर, ॲड.अंकुश वाघमोडे, पांडुरंग अल्लापूरकर, नंदकुमार देशपांडे, सिस्टीम ऑफिसर नईम मोमीन, न्यायालयीन कर्मचारी.के. के. शेख, विशाल ढोबळे, विवेक कणकी तसेच प्रशालेचे मुले-मुली उपस्थित होते.



# तांत्रिक कामगार सहकारी पतसंस्थेच्या वतीने सम्यक सोनकांबळे यांची सत्कार

पुणेः इयत्ता सातवी मध्ये ९५ टक्के गुण मिळवून शाळेत प्रथम क्रमांक आल्याबद्दल सम्यक शरणबसपा सोनकांबळे यांचे विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार सहकारी पतसंस्था मर्यादित पुणे यांच्यावतीने समारंभ पूर्वक प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले यावेळी पतसंस्थेचे चेअरमन , व्हाईस चेअरमन, सेक्रेटरी , संचालक मंडळ व कर्मचारी वर्ग आणि विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार सहकारी पतसंस्थाचे सदस्य व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# टाकळीवाडीतील गावतलाव मोजणी करण्यासाठी ग्रामसेविका यांना निवेदन



टाकळीवाडी/नामदेव निर्मळेः टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील समाजसेवक लक्ष्मण चिगरे व आकाश वडर यांच्यावतीने १९७२ वर्षी दुष्काळ काळात खोदलेल्या तळ्याची मोजणी करण्यात यावी व सुशोभीकरण करण्यात यावे यासाठी निवेदन ग्रामपंचायत टाकळीवाडी येथील ग्रामसेविका सौ अनघा सांगावे मॅडम यांना देण्यात आले. या तळ्याचे क्षेत्र ३ हेक्टर ९१ आर असे असून सध्या येथे एवढे क्षेत्र भरत नाही. १९७२ काळी दुष्काळ पडला होता.गावकऱ्यांना काम नव्हते. भविष्यात पाणी टंचाई भासू नये पाणी साठा करता यावा या उद्देशाने हा तळा खोदण्यात आला. परंतु आता तळा नामशेष होण्याच्या मार्गावरआहे.अनेकांनी या क्षेत्रामध्ये अतिक्रमण केलेले आहे. सध्या तळ्याचे

क्षेत्र अतिक्रमणामुळे कमी झालेले आहे.सध्या टाकळीवाडी गावामध्ये पाणी प्रश्न गंभीर असल्यामुळे त्वरित या तळ्याची मोजणी करावे अशी मागणी आता जोर धरत आहे. आता फक्त हा तळाच भविष्यात गावासाठी वरदान ठरणार आहे. यावर्षी सुद्धा दुष्काळाचे स्वरूप दिसून येत असल्यामुळे गावांमध्ये पाणीटंचाई भासत आहे. गावाला नदी नाही. सध्या गावांमध्ये पाणीटंचाई फार आहे. ग्रामसेविका नुकत्याच आता ग्रामपंचायत मध्ये रुजू झालेले आहेत. आता हा प्रश्न कोणत्या पद्धतीने हाताळणार व ग्रामपंचायत यावर काय निर्णय घेणार याची जोरदार चर्चा गावात चालू आहे. विशेष म्हणजे आतापर्यंत कोणत्याही व्यक्तीने या तळ्याचा प्रश्न पुढे केलेला नव्हता. हा चर्चेचा विषय बनला आहे.त्वरित मोजणी करून तळ्याचे सुशोभीकरण करावे ही मागणी आता सर्वच ग्रामस्थांकडून जोर धरत आहे.

# निसर्गाच्या संरक्षण करणे आमचं कर्तव्य



अक्कलकोट/प्रतिनिधीः निसर्गाच्या रक्षण करणं आमचा कर्तव्य असून प्रत्येकाने एक झाड लावून समजिक बांधिलकी म्हणून समाजाचे ऋण फेडण्यासाठी पुढाकार घ्यावा असे आवाहन निसर्ग माझा सखा ग्रुपचे अध्यक्ष पर्यावरण प्रेमी ,निसर्गप्रेमी अरविंद म्हेत्रे यांनी केले.नागणसुर येथील जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड मुली / मूले शाळेत वृक्षारोपण करून पक्ष्यांसाठी कृत्रिम घरटे तयार करणे आणि निसर्ग संवर्धन करण्यासाठी विद्यार्थ्यांना आयजित मार्गदर्शन शिबिरात बोलत होते.पुढे बोलून निसर्गाच्या सान्निध्यात राहून आपण दररोज काही न काही निसर्गा कडून घेत असतो.

त्यासाठीआपणसुद्धा निसर्गाच्या देणं लागतो. कश्या पद्धतीने याची सुरूवात वृक्षारोपण, निसर्गाच्या सान्निध्यात राहणारे प्राणी पक्षी यांच्या संरक्षण करणे महत्त्वाचे असते. त्या साठी आपण वृक्षतोड न करता वृक्ष लागवड करणे त्याचे निगा राखणं महत्त्वाचं आहे.आज मातृ सुरक्षा दिन निमित्ताने वृक्ष माता वृक्ष पिता या वृक्षसंवर्धन करून साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षास्थानी केंद्रीय मुख्याध्यापक विद्याधर गुरव यांनी भूषविले होते. प्रमुख अतिथी म्हणून निसर्ग माझा सखा ग्रुपचे अध्यक्ष अरविंद सिद्धेश्वर म्हेत्रे, आदित्य म्हेत्रे,शुभम म्हेत्रे तसेच कन्नड मुलींची शाळा मुख्याध्यापक मल्लिनाथ कवठे, कल्लय्या गणाचारी, शरणप्पा फुलारी, शिवशरण म्हेत्रे, खाजप्पा किणगी, राजकुमार कुर्ले, लक्ष्मीकांत तळवार, बसवराज स्वामी, शांताबाई तोळणुरे, लक्ष्मी देगांव, चन्नम्मा बिरादार, उपस्थित होते. यावेळी विद्याधर गुरव यांनी बोलून समाजासाठी आपण निसर्ग सेवा फाउंडेशन माध्यमातून विविध सामाजिक हिताचे कार्य करत असून जोड म्हणून निसर्ग माझा सखा ग्रुपचे कार्य स्तुत्य असून सर्वांनी सहकार करण्याची गरज आहे.प्रत्येकानी प्रामाणिक पणाने निसर्गासाठी कार्य करणे गरजेचे आहे असे म्हणाले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन श्री शरणप्पा फुलारी यांनी केले तर आभार शिवशरण म्हेत्रे यांनी मानले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील विद्यार्थी विद्यार्थिनी परिश्रम घेतले.